# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०३/२०२४ (गुरूवार) सकाळ**


---

## पारशिवनी परीसरात सुरु असणाऱ्या वेश्याव्यवसायावर धाड टाकुन देहव्यापार करणाऱ्या ०२ पिडीत महिलांची सुटका करुन आरोपीस केली अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची धडक कारवाई

दिनांक १३/०३/२०२४ ते दिनांक १४/०३/२०२४ चे २०.५० वा. ते ०१.३० वा. दरम्यान अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, नागपूर ग्रामीण यांना गुप्त बातमीदाराकडनु खात्रीशीर माहिती मिळाली आहे की, आरोपी नामे— रूपेश चिंतामण कोहळे, रा. वार्ड नं. ०१, जय भोले नगर, चनकापूर ता. सावनेर हे स्वत:चे आर्थीक फायदयाकरिता मुलींना पैशाचे आमीश देवून देहव्यापारास प्रवृत्त करून त्यांना ग्राहकांना पुरु वुन इटगाव फाटा खापरखेडा ते पारशिवनी रोड येथील पाहीजे आरोपी रामुजी उर्फ रामदास गुंडेराव काकडे यांच्या मालकीचे किरायाने घेतलेले काकड` बार ॲड रेस्टॉरेटं या ठिकाणी देहव्यापार करवुन घेतो. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी पोलीस पथकाने जावुन छापा टाकुन पढु ीलप्रमाणे कारवाई केली. मिळालेल्या प्राप्त खबरेनुसार पोलीस पथकाने सदर ठिकाणी धाड टाकली असता आरोपी नामे— १) रूपेश चिंतामण कोहळे, रा. वार्ड नं. ०१, जय भोले नगर, चनकापूर ता. सावनेर २) पाहीजे आरोपी रामुजी उर्फ रामदास गुंडेराव काकडे यांचे विरुध्द कलम ३, ४, ५ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६, सहकलम ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोदं करुन ०२ पिडीत महिलेची सुटका करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक जयपालसिहं गिरासे, सपोनि अमित पांडे, पोहवा ललीत उईके, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, मपोशि मालु मोहीते, पोशि कार्तीक पुरी, बालाजी बारगलु यांचे पथकाने केली.

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे सावनेर :— अंतर्गत मटन मार्केट जवळ सावनेर दि. १३/०३/२०२४ चे १२.१५ वा. दरम्यान फिर्यादी व जखमी नामे — शुभम डरेड धुर्वे, वय २६ वर्ष, रा. शक्तीनगर डब्लु सीएल वाघोडा सावनेर हे बर्गर सिंग रेस्टॉरेस्ट मध्ये मॅनजेर म्हणून काम करतो. फिर्यादीच्या वडिलांचे नाव डरेड भागले ाल धुर्वे आहे आणि फिर्यादीचा मित्र नामे— रितिक कछवा त्याचा मित्र विधीसंघर्ष बालक यास २ ते ३ महिन्यांपासून ओळखतो. घटना ता. वेळी फिर्यादीची मोसा क्र. MH 40 AG 8970 ने रेल्वे स्टेशन रोड सावनेर येथे फिर्यादीचा चुलत भाऊ नामे—निशांत प्रतियाल बुनकर याचे सोबत नाश्ता करणेसाठी आले असता तेव्हा बापू नावाच्या एका मुलाने त्याच्या मोटरसायकलवरून स्पीडने रेल्वे स्थानकाकडून मुख्य रोडकडे येत असताना फिर्यादीला कट मारली. या कारणावरून फिर्यादीने त्यास हटकले असता त्यांच्यात बाचाबाची झाली. नाश्ता आटपून फिर्यादी गडकरी चौक मार्गे राहते घरी डब्ल्यू सीएन कॉलनी वाघोडाकडे निघाले असता तेव्हा दुपारी १२.१५ वाजता दरम्यान सावनेर जवळील मटन मार्केट जवळ, आरोपी १) अशोककुमार उर्फ बापु राजकुमार गजरे वय १९ वर्ष रा. पहलेपार सावनेर व विधीसंघर्ष बालक यांनी स्प्लेडंर प्लस मोटरसायकलवर येवुन फिर्यादी आणि त्याचा चुलत भाऊ निशांत बुनकर यांच्यावर जिवे मारण्याच्या उद्देशाने तलवारीने हल्ला केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रीपोर्ट वरून पोस्टे सावनेर येथे कलम ३०७, ३४१, ३२३, ५०४, ३४ भांदवि सहकलम ४/२५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोदं केला असुन आरोपी क्र. १) यास सावनेर पोलीसांनी अटक केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राठोड मो. नं. ९५२७५३७७१६ हे करीत आहे.

## सट्टापट्टी लिहणारे अवैध धंदेवाईकांवर धाडसत्र मोहीम

पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथील स्टाफ यांनी दि. १३/३/२०२४ रोजी अवैध धंदेवाईकांवर धाडस मोहीम राबविली. पोलीस स्टेशन बुट्टीबोरी हद्दीमध्ये लोकांकडनु पसै घेवुन वरली मटक्याचे सट्टीपट्टीचे आकडे लिहुन जगु ार खेळ खेळविणारे आरोपी नामे— १) प्रतिक बाबाराव वाघमारे वय २० वर्षे रा. सोनेगाव बेगडे पो. खडसंगी ता चिमुर जि. चंद्रपूर ह. मु. सिडको कॉलनी सातगाव त. हिंगणा जि. नागपूर २) विजय विठ्ठलराव गोने वय ३० वर्षे रा. जामगाव त. नरखेड जि. नागपूर ह. मु. शेख यांच्या घरी किरायाने वर्धमान नगर बोरी त. जि. नागपूर ३) आदीनाथ गोविंदा कांबळ वय ५५ वर्षे, रा. सातगाव दुधाळा ता जि नागपुर ४) विधी संघर्ष बालक ५) अक्षय कृष्णाजी रायपरु े वय २४ वर्ष रा. वार्ड क्र ४ बोरी ६) निखीलेश गोपाल पाठक वय २० वर्षे, रा. वार्ड क्र. ३ बोरी यांचेवर कारवाई केली असुन त्यांचेकडुन सट्टापट्टीचे साहीत्य, वेगवेगळे मोबाईल व नगदी असा एकुण ५४६६९/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पोलीस स्टेशन बोरी येथ े आरोपीविरूध्द गुन्हे नोदं करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पोस्टे बोरी येथील ठाणेदार ह्वदयनारायण यादव व इतर स्टाफ यांनी केलेली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**